पोलीस निरीक्षक, परतूर
प्रभारी अधिकारी
जि. जालना

फिर्याद.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** जालना **P.S.(ठाणे):** परतूर **Year (वर्ष):** 2021

FIR No.(प्रथम खबर क्र.): 0410 Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 08/09/2021 18:52 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

**3. (a) Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1 Day(दिवस): बुधवार
Time Period (कालावधी): पहर 5 .
Date From (दिनांक पासून): 08/09/2021
Date To ( दिनांक पर्यंत): 09/2021
Time From (वेळेपासून): 15:53 बजे
Time To (वेळेपर्यंत): 15:53 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
**Date** (दिनांक ): 08/09/2021 **Time** (वेळ): 18:42 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ
Entry **No.** (नोंद क्र.): 016 Date & Time (दिनांक आणि वेळ): 08/09/2021 18:42 बजे

**4. Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

**5. Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पूर्व, 2 किमी
**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address (पत्ता):** परतुर शहरातील आदर्श कलनी जवळ , परतुर, परतुर

(c) in **case, outside the** limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):
District(State) (जिल्हा(राज्य)):

**6. Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) Name (नाव): रवि पिता भुजंगराव जाधव

**(b) Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1991 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID **No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): Date of **Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्त्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | मुपोबाकुलतारा तापरतुर,परतुर,परतुर ,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | मुपोबाकुलतारा तापरतुर,परतुर,परतुर ,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल नं.):

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपींचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.वैभव बालासाहेब पिंपळे | | | 1. हमुआदर्श कलनी परतुर जिजालना, परतुर,परतुर ,जालना,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | [illegible] | [illegible] | [illegible] 6 [illegible] एकुण 3000/रु [illegible] | 3,000.00 |

10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकुण मुल्य (रू. मध्ये)): 3,000.00

11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ आकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 First information contents (प्रथम खबर हकिकत ):

फिर्यादि.08.09.2021.म रवि पिता [illegible] जाधव वय 30 वर्ष व्यवसाय मजुरी मु.पो.बाकुलतारा ता.परतुर जि.जालना मोबाईल नंबर 9923210223.समक्ष पोलीस स्टेशन परतुर येथे हजर राहुन फिर्याद देतो की, मी दिनांक 08/09/2021 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे तक्रार दिली होती की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन मला एक मुलगा व दोन मुली असुन मी मजुरी करुन पोट भरतो. मला ग्रामपंचायत कार्यालय बाकुलतारा मार्फत शासनाच्या रमाई आवास योजना मध्ये सन 2019-20 या सालो घरकुल साठी दाखल केली होती.त्यानंतर सदरची फाईल ही ग्रामपंचायत मार्फतीने पंचायत समिती परतुर येथे सादर करण्यात आली होती.त्यानुसार घरकुलाच्या झालेल्या कामाची पाहणी करण्यासाठी पंचायत समिती परतुर येथील ग्रामीण गृह निर्माण अभियंता श्री.वैभव पिंपळे यांनी तीन वेळेस गावात येवुन माझे बांधकाम चालु असलेल्या घराचे पाहणी करुन त्याचे फोटो घेवुन पंचायत समिती परतुर येथे दाखल केले.त्यानुसार मला पहिला हप्ता पंधरा हजार रुपये, दुसरा हप्ता पंचेचाळीस हजार रुपये व तिसरा हप्ता चाळीस हजार रुपये असे एकुण एक लाख रुपये माझ्या खात्यावर जमा झालेले आहे. यापुर्वी ग्रामीण गृह निर्माण अभियंता श्री.वैभव पिंपळे माझ्या कडुन प्रथम एक हजार रुपये, त्यानंतर अडीच हजार रुपये व चौदाशे रुपये असे एकुण 4900/- रुपये घेतले होते.माझ्या घराचे सदर योजने मध्ये दोन महिन्या पुर्वी बांधकाम पुर्ण झालेले आहे.माझ्या घरकुलाचा शेवटचा हप्ता 20,000/-रुपये माझ्या खात्यावर जमा करण्यासाठी ग्रामीण गृह निर्माण अभियंता श्री.वैभव पिंपळे हे मला 1000/-रुपयाची मागणी करीत आहे. तसेच माझे चुलत काका नामे छबुराव पुंडलिक जाधव यांचे पण रमाई आवास योजने अंतर्गत घरकुलाचे बांधकाम चालु आहे.त्यांचे पण घरकुलाची पाहणी करण्यासाठी श्री.वैभव पिंपळे हे दोन वेळेस येवुन पाहणी करुन फोटो घेवुन गेले होते.त्यांचे पण दोन हप्ते त्यांच्या खात्यावर जमा झालेले आहे.श्री.पिंपळे हे त्यांच्या पण झालेल्या कामाचा तिसरा हप्ता टाकण्यासाठी 2000/-रुपयाची मागणी माझ्या कडे करत आहे.माझी श्री.वैभव पिंपळे यांना लाच देण्याची इच्छा नाही परंतु लाच दिली नाही तर ते माझे व माझे चुलत काका छबुराव जाधव यांचे घरकुलाचे पैसे खात्यावर जमा करणार नाही. श्री.वैभव पिंपळे यांचेशी माझी वैयक्तीक दुष्मनी नाही,अगर देण्याघेण्याचा अथवा उधारीचा आर्थीक व्यवहार नाही. श्री.वैभव पिंपळे हे माझ्याकडे मागत असलेले पैसे लाचेचे असल्याचे मला माहित आहे.त्यांनी मागणी करीत असलेले तीन हजार रुपये मी सोबत आणलेले आहे. सदर श्री.वैभव पिंपळे ग्रामीण गृह निर्माण अभियंता यांनी मला आज रोजी पंचायत समिती परतुर येथे भेटण्यासाठी बोलावले असुन मी सदर ठिकाणी जाऊन त्यांची भेट घेणार असुन त्यांना माझे व माझे चुलत काका छबुराव जाधव यांचे घरकुलाचे पैसे खात्यावर जमा करण्यासाठी विनंती करणार आहे. त्यांनी माझ्या कडे लाचेची मागणी करुन त्यांनी स्वतः किंवा इतर मार्फत लाच स्विकारल्यास त्यांना पकडून योग्य ती कायदेशिर कारवाई करावी ही विनंती अशी तक्रार दिली होती. त्यावरुन ला.प्र.वि.जालना येथील पोलीस निरीक्षक श्री.शेख साहेब यांनी माझी तक्रार संगणकावर टंकलीखीत करुन पंचाची ओळख करुन देवुन त्यावर माझी व पंचाची सही घेतली.त्यानंतर तात्काळ सदर तक्रार श्री.वैभव पिंपळे

ग्रामीण गृह निर्माण अभियंता यांचे विरुध्द केलेली खरी आहे काय व ते माझ्याकडे लाच मागतात काय याची खात्री करण्यासाठी,लाचेच्या मागणीची पडताळणी करण्यासाठी पोनि श्री.शेख साहेब,पंच व सापळा पथक असे लाप्रवि जालना येथुन सरकारी वाहनानें परतुर येथे जाण्यासाठी रवाना झालो. परतुर शहराच्या अलीकडे सेलु टी पईंट जवळ पोहचुन पोनि श्री.शेख साहेब,पंच व सापळा पथक असे सुरक्षित ठिकाणी थांबलो. तेंव्हा मी श्री.पिंपळे यांना फोन करुन कोठे येवु असे विचारले असता त्यांनी मला तहसिल कार्यालय परतुर समोरील त्यांचे जगदंब मल्टी सर्व्हिसेस दुकानावर ये असे सांगितले असता सदर ठिकाणाहुन माझ्या सोबत पंच श्री.निलेश शिरभाते यांना देण्यात आले.माझ्याकडे व्हाईस रेकर्डर मशीन सुरु करुन देण्यात आले होते.त्यानंतर मी जगदंब मल्टी सर्व्हिसेस दुकानावर जावुन श्री.वैभव पिंपळे ग्रामीण गृह निर्माण अभियंता यांची भेट घेतली असता श्री.वैभव पिंपळे यांनी माझे व माझे चुलत काका छबुराव जाधव यांचे घरकुलाचे पैसे खात्यावर जमा करण्यासाठी माझे स्वत:चे 1000/-रुपये व चुलत काकाचे 2000/-रुपये असे एकुण 3,000/-रुपये माझ्या जवळ लाचेची मागणी करुन जगदंब मल्टी सर्व्हिसेस दुकानावर घेवुन येण्यास सांगितले असता तसा लाच मागणी पडताळणी पंचनामा सापळा पथकाने केला. त्यावरुन दिनांक 08.09.2021 रोजी ला.प्र.वि. जालना येथील पोलीस निरीक्षक श्री.शेख यांनी व त्यांचे पथकाने ग्रामीण गृह निर्माण अभियंता श्री.वैभव पिंपळे यांचे विरुध्द सापळा लावण्याचे ठरविण्यात आले. परतुर शहराच्या अलीकडे सेलु टी पईंट जवळ सुरक्षीत ठिकाणी सरकारी वाहनामध्ये अंथ्रासीन पावडरची माहीती देवुन मला व पंचांना त्याचे प्रात्यक्षीक दाखविण्यात आले. श्री.वैभव पिंपळे यांना लाच म्हणुन देण्यासाठी माझ्याकडे असलेल्या पैशातुन पाचशे रुपये दराच्या 06 नोटा वेगळे काढुन त्यांचे क्रमांक लिहुन घेवुन 3,000/- च रक्कमेवर अंथ्रासीन पावडर लावले. श्री.वैभव पिंपळे यांना देण्यासाठी अंथ्रासीन पावडर लावलेले पैसे माझ्या पन्टचे उजव्या खिशात ठेवले.सर्वांना त्यांचे कामे समजावुन सांगुन सुचना देण्यात आल्या.त्यावेळी मला पोलीस निरीक्षक श्री.शेख यांनी श्री.वैभव पिंपळे यांना फोन करुन पैसे कोठे घेवुन येऊ अशी विचारण्याची सुचना दिल्याने मी माझ्या फोन वरुन श्री.वैभव पिंपळे यांना फोन केला असता त्यांनी मला परतुर शहरातील कलेज रोडवर आर्दश कलनी येथे येण्यास सांगितले असता पोलीस निरीक्षक श्री. शेख व सापळा पथक यांच्या सुचनेनुसार सदर ठिकाणी सापळा लावण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.शेख साहेब यांनी मला सुचना दिल्या की, श्री.वैभव पिंपळे यांनी लाच स्वीकारल्या नंतर तुम्ही सदर ठिकाणाहुन तोंडाचा मास्क काढुन हाताने तोंड पुसुन ईशारा करण्याचे सुचना दिल्या.त्यावरुन मला व पंच श्री.निलेश शिरभाते यांना परतुर शहरातील कलेज रोडवर थांबण्यास सांगुन त्याठिकाणी परिसरात पोलीस निरीक्षक श्री.शेख साहेब व सर्व स्टफ तसेच पंच नं.2 श्री.भागवत वाघ असे येवुन सर्व जण एकमेकांना दिसतील अशा प्रकारे थांबले. श्री. वैभव पिंपळे यांचे विरुध्द परतुर शहरातील कलेज रोडवर आर्दश कलनी येथे सापळा लावण्यात आला.मी व पंच श्री.निलेश शिरभाते असे दोघे जण परतुर शहरातील आर्दश कलनी येथे जावुन कलेज रोडवर श्री.वैभव पिंपळे यांनी अंदाजे 15.53 वाजेच्या सुमारास लाचेची मागणी केली असता मी माझे उजव्या हाताने पन्टच्या उजव्या खिश्यातुन 3,000/- लाचेची रक्कम काढुन त्यांच्या समोर धरली असता त्यांनी 3,000/- रुपये लाचेची रक्कम डाव्या हाताने स्विकारुन त्यांच्या पन्टच्या पाठीमागील डाव्या खिश्यात ठेवली.त्यावेळी पंच श्री.निलेश शिरभाते हे समक्ष हजर होते.त्यानंतर मी सापळा पथकास आधी ठरल्या प्रमाणे इशारा केला तेव्हा पोलीस निरीक्षक श्री.शेख साहेब व स्टफ तसेच पंच नं.2 श्री. भागवत वाघ असे लगेच त्याठिकाणी येवुन ग्रामीण गृह निर्माण अभियंता श्री.वैभव पिंपळे यांना लाचहातोच पकडले.मला पोलीस निरीक्षक श्री.शेख साहेब यांनी जवळ बोलावुन त्याठिकाणी माझे जवळील व्हाईस रेकर्डर बंद केला व पोलीस निरीक्षक श्री.शेख साहेब यांनी ग्रामीण गृह निर्माण अभियंता श्री.वैभव पिंपळे यांना त्यांची स्वत:ची व सर्वांची ओळख करुन दिली.पोलीस निरीक्षक श्री.शेख साहेब यांनी श्री.वैभव पिंपळे यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे पुर्ण नाव श्री.वैभव बालासाहेब पिंपळे वय 24 वर्षे व्यवसाय कंत्राटी ग्रामीण गृह निर्माण अभियंता, पंचायत समिती परतुर रा.राणी उंचेगाव ता.गंगाखेड जि.परभणी ह.मु.आर्दश कलनी परतुर जि.जालना असे सांगितले.तेव्हा तेथेच पंचा समक्ष त्यांची झडती घेवुन त्यांनी स्वीकारलेली लाचेची रक्कम पाचशे रुपये दराच्या 6 नोटा एकुण 3,000/-रुपये पंचा समक्ष जप्त केले तसेच त्यांचे दोन्ही हाताचे तळव्यावर व बोटाचे पे-यावर तसेच पन्टवर अल्ट्राव्हायलेट लॅम्पच्या प्रकाशात तपासणी केली असता त्यांचे डाव्या हातावर व पेंटेशावर तसेच पन्टच्या पाठी मागील डाव्या खिश्यावर हिरव्या रंगाची चकाकी दिसुन आली व माझे हात तपासण्यात आले.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.शेख साहेब, स्टाफ, दोन्ही पंच,मी व श्री.पिंपळे यांना सोबत घेवुन पोलीस स्टेशन परतुर येथे आलो.सर्व घटने बाबतचा सविस्तर पंचनामा पथकाने केला.दिनांक 08.09.2021 रोजी दुपारी 15.53 वा.चे सुमारास परतुर शहरातील आर्दश कलनी जवळ कलेज रोडवर येथे कंत्राटी ग्रामीण गृह निर्माण अभियंता, पंचायत समिती परतुर यांनी माझे व माझे चुलत काका छबुराव जाधव यांचे घरकुलाचे पैसे खात्यावर जमा करण्यासाठी पंच श्री. निलेश शिरभाते यांचे समक्ष माझे स्वत:चे 1000/-रुपये व चुलत काकाचे 2000/-रुपये असे एकुण 3,000/- रुपयेची लाचेची मागणी करुन 3,000/- रुपयाची लाच स्विकारली तेव्हा रंगेहात पकडण्यात आले आहे.त्यांचे विरुध्द कायदेशिर कारवाई करावी ही विनंती. मी दिलेली फिर्याद माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन ती मी वाचुन पाहीली ती बरोबर व खरी आहे.

( एस.एस.शेख )　　पोलीस निरीक्षक,　　समक्ष　　हि फिर्याद दिली सही

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना

13. Action　Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरुन अपराध घडल्याचे.)

(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): or (किंवा)

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): RAVINDRA DEVIDAS NIKALJE
Rank (पद): I (Inspector)
No.(क्र.): PI　to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारन हस्तांतरित) .

F.I.R. **read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

रवि

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची

ठाणेदार
पोलीस ठाणे मरदूर

Name ... Thakare

Rank(पद): I (Inspector)

No.(सं.): API